
# बीड शहरांसह तालुक्यात पोलिस चुपसे, मटका फिरसे, पोलिसांची कारवाई थंडावली..!


अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564


■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – २२३ ■ शुक्रवार दि.२ मे २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 223 ■ Friday Dt.2 May 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4


# ओपन जेवू देईना आणि क्लोज झोपू देईना, हे वाक्य बीड शहरात सत्यात उतरले?

## पोलिसांच्या आशीर्वादाने मटका जोरात सुरु; पोलिसांकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष?

- मटका थांबला की चोऱ्यांचे प्रकार आपोआप बंद होतील, नागरिकांचा विश्वास!
- मटका पायी शेकडो कुटुंबीयांचे संसार उद्ध्वस्त; अनेकांना मटक्याने लावला चटका?
- मटका चालवणाऱ्यांना पोलिसांचा धाक राहिलेला नाही, यामुळे खुलेआम मटका सुरू?

## पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत साहेब, आपण याकडे विशेष लक्ष घालून मटका चालवणाऱ्यांवर कारवाई कराच? मटका खेळणाऱ्यांत अनेक गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक; पैसा मिळवण्याच्या हेतूने ते चोऱ्यांसारखे गुन्हेही करू लागले?



बीड । प्रतिनिधी

बीड शहरांसह तालुक्यात मटका सर्रास चालू आहे. या मटका पायी शेकडो कुटुंबीयांचे संसार उद्ध्वस्त होत आहेत. याकडे मात्र पोलिसांचे दुर्लक्ष होत आहे. अगोदरच गोरगरीब जनता हाताला काम नसल्यामुळे आर्थिक अडचणीत आलेली असताना मटक्याने चटका लावला आहे. घरातील काहीही विकून किंवा व्याजाने खासगी सावकारांचे पैसे घेऊन अनेकजण मटक्याचे आकडे लावीत आहेत. यामुळे हजारो कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त होत आहेत. या गंभीर प्रकाराकडे पोलिसांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे. याकडे पोलीस प्रशासन दुर्लक्ष का? करत आहे. यामधून पोलिसांना मलिंदा मिळत आहे का अशी उलट सुलट चर्चा नागरिकांतून ऐकायला मिळत आहे. तसेच सुरू असलेला मटका तात्काळ पोलिसांनी बंद करावा अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

बीड शहरात जागोजागी पोलीस बंदोबस्त असूनही अवैध धंद्यांना उत आलाय. मटका, जुगार जोरात चालू आहे. अवैधरित्या दारू विक्री होत आहे, मोबाईल चोरी, भुरट्या चोरीचे प्रमाण वाढले आहे. गुन्हेगारांवर पोलिसांचा वचक राहिला नाही. अवैध धंद्यांमुळे गोरगरिबांचे संसार मात्र उद्ध्वस्त होत आहेत. बेरोजगारीमुळे अनेक तरुण या व्यवसायाकडे आकर्षित होत आहेत. यामुळे शहरात गुन्हेगारी वाढत आहे. यामुळे पोलिसांनी तातडीने सुरू असलेले अवैध धंदे बंद करून गोरगरीब जनतेला न्याय द्यावा, अशी पेक्षा गोरगरीब जनता करीत आहे.

बीड जिल्ह्यात मागील काही वर्षांपासून अवैध धंद्यांनी कळस गाठला आहे. परंतु जिल्ह्याला नवीन सिंघम अधिकारी लाभलेले पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत हे आल्यापासून अवैध धंद्यांना ब्रेक लागला होता. जिल्ह्यातील हवेत धंदे मोडीत काढण्यासाठी पोलीस अधीक्षकांनी सर्व ठाणे प्रमुखांना कडक कारवाईच्या आदेश दिलेले होते. परंतु आता पुन्हा अवैध धंदे सुरू असल्याचे दिसून येत आहे. बीड शहरांसह तालुक्यात मटका, जुगार हे अवैध धंदे खुलेआम सुरू आहेत. हा धंदा करणाऱ्यांना पोलिसांचा धाक राहिलेला नाही. यामुळे मटका खुलेआम सुरू आहे. या अवैध उद्योगांकडे पोलिसांकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे पोलिसांच्या पाठिंब्यानेच मटका सुरू आहे काय, अशी शंका घेतली जात आहे. मटक्याचे परंपरेने चालत आलेले 'ओपन जेवू देईना आणि क्लोज झोपू देईना, हे वाक्य बीड शहरांसह तालुक्यात सत्यात उतरले आहे. बीड परिसरात मटका जोरात सुरू आहे. शहराच्या ठिकाणांसह ग्रामीण भागातही मटका एजंटांची संख्या वाढताना दिसते आहे. मटका खेळणाऱ्यांत अनेक गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्ती असल्याने पैसा मिळविण्याच्या हेतूने ते चोऱ्यांसारखे गुन्हेही करतात. यामुळेच मटका थांबला की चोऱ्यांचे प्रकार आपोआप बंद होतील, असा नागरिकांना विश्वास आहे.

## महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे बॅनर फाडून अवमान, एका चार चाकी वाहनाचे नुकसान

# पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल

केज । प्रतिनिधी

केज शहरातील महात्मा फुले नगर भागातील एका किराणा दुकानावर महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शुभेच्छाचे बॅनर लावलेले असून सदर बॅनर फाडून अवमान केल्याप्रकरणी व एका चार चाकी वाहनाचे नुकसान केले प्रकरणी पाच जणांविरुद्ध केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, दिनांक २९ एप्रिल २०२५ रोजी मध्यरात्री एक १-४५ ते २-०० वा.सुमारास केज शहरातील एल.एफ.सी.चौक महात्मा फुले नगर या ठिकाणी प्रदीप काशिनाथ गायकवाड रा. महात्मा फुले नगर केज यांची मारुती सुझुकी कंपनीची चार चकी गाडी क्र.एम.एच.१६ झेड ३७७६ सदर गाडीचे काचा वरील दोन्ही बाजूचे वायफर




तोडून गाडीच्या बाजूला टाकून दिले होते. प्रदीप गायकवाड यांच्या गाडीचे २५०० रुपयांचे नुकसान झाले आहे.

दिनांक ३० एप्रिल २०२५ रोजी सकाळी ठीक १०-०० वाजता प्रदीप गायकवाड हे एल.एफ.सी. चौक येथे गाडी लावलेल्या ठिकाणी गेले असता सदर प्रकार हा त्यांच्या निदर्शनास आला. त्यानंतर प्रदीप गायकवाड यांनी त्यांची गाडी उभा केलेल्या ठिकाणच्या समोरच्या एका घराचे सीसीटीव्ही कॅमेरे चेक केले असता सुमित कैलास लांडगे रा. फुलेनगर केज व त्यांच्यासोबत अनोळखी इस्मानी सदर गाडीचे नुकसान केले आहे.

त्याच दिवशी सदर वेळेमध्ये तात्या लहू गवळी रा. महात्मा फुले नगर केज यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शुभेच्छाचे बॅनर त्यांच्या स्वतःच्या किरण दुकानासमोर भिंतीवर लावलेले आहे. सदर बॅनर वर महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह सर्व महामानवांचे फोटो व तात्या गवळी व त्यांच्या मुलाचा फोटो असलेले बॅनर हे


पान २ वर


## भाजपच्या २० नवनियुक्त मंडळ अध्यक्षांचा ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते सत्कार

# सूक्ष्म नियोजनातून जिल्ह्यात पक्षाची बांधणी आणखी मजबूत करा : ना. मुंडे

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

भारतीय जनता पक्षात सुरु असलेल्या संघटनात्मक निवडणुकी अंतर्गत बीड जिल्ह्यातील वीस मंडळाच्या अध्यक्षांच्या नुकत्याच नियुक्त्या करण्यात आल्या होत्या. आज ह्या सर्व मंडळ अध्यक्षांनी गोपीनाथ गडावर जाऊन लोकनेते मुंडे साहेबांच्या समाधीचे दर्शन घेतले. त्यानंतर सायंकाळी राज्याच्या पर्यावरण आणि पशूसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते सर्व नवनियुक्त मंडळ अध्यक्षांचा सत्कार करण्यात आला. आगामी काळात पक्ष बांधणी आणखी मजबूत करण्यासंदर्भात सूचना देऊन त्यांनी पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला.

जिल्ह्यातील वीस मंडळ अध्यक्षांच्या निवडी करताना सर्वांनी निवडीचे अधिकार



एकमताने ना. पंकजाताई मुंडे यांना सोपवले होते. भारतीय जनता पक्षाने शंभर बूथ मागे एक मंडळ अध्यक्ष अशी संघटनात्मक रचना केल्यामुळे आपल्याला सर्व घटकांना समान संधी देता आली असल्याचे यावेळी ना. पंकजाताई मुंडे म्हणाल्या. नव्या आणि जुन्या अशा सर्वांना संधी मिळाल्याने भाजपचे कार्यकर्ते जिल्ह्यात पक्षाची ताकद वाढवतील असेही त्यांनी सांगितले.


पान २ वर

# वाढत्या तापमानामुळे आणि मानवी चुकांमुळे बीड जिल्ह्यात वनविभागात आगीच्या घटनात वाढ

# आगीच्या घटना रोखण्यात वनविभागाला अपयश

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यात यंदा कडाक्याचा उन्हाळा जाणवत असुन दिवसाचे तापमान ४३ अंतापर्यंत पोहोचले आहे. तापमानात वाढ झाल्याने जमिन तापु लागली आहे.वाढत्या तापमानामुळे जमिनीतील ओलावा नष्ट होऊन गवत वाळले आहे. झाडांची पाने सुकुन खाली पडली आहेत त्यामुळे आग लागण्याचा धोका वाढला आहे.

त्यामुळे वनविभागात आगीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. काही ठिकाणी मानवी चुकांमुळे पावसाळ्याच्या दिवसांत गवत व चारा चांगला येण्यासाठी नागरीकांकडुन गुपचूप हा पालापाचोळा पेटवून दिला जातो. ही आग पुढे जाऊन वनपरिक्षेत्रात पोहोचल्याने तेथील वनसंपत्ती, वन्यप्राण्यांना याची झळ बसते. यातुन वणवा पेटुन वनविभागाचे मोठे नुकसान होते.





वनविभाग आगीच्या घटनांना नियंत्रणात आणण्यासाठी शिताफीचे प्रयत्न करताना दिसत आहे. आग लागण्याची शक्यता टाळण्यासाठी वनविभागाची जागृती मोहीम, नागरीकांना सावध करणे, आग प्रतिबंधक उपाययोजना तोकड्या पडत असल्याचे दिसून येत आहे. या वणव्यात शेकडो झाडे जळून खाक होत आहेत. शेकडो पक्षी, सरपटणारे प्राणी मृत्युमुखी पडत आहेत. वनविभागाने या गोष्टींकडे गांभीर्याने लक्ष देऊन डोंगराला लागणारे वनवे रोखावेत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

बीड तालुक्यातील बीड वनपरीक्षेत्रातील नागझरी डोंगराला काल दि.०१ गुरूवार रोजी दुपारी १ वाजता आग लागली. ऐन कडक उन्हाळ्यात आग डोंगराला आग लागल्याने आगीने रौद्ररूप धारण केले होते. डोंगराला लागलेली आग विझवण्यासाठी वनविभागातील हनुमंत वायभट, दशरथ गुजर, विलास नवले, शंकर शिंदे, मधुकर नैराळे, बबन पाव्हणे, गौतम वीर, चंद्रकांत बडगे, महेश मेटे, शेख अकबर, परमेश्वर पाव्हणे, परमेश्वर नाईक, शहादेव चव्हाण, बळीराम चव्हाण, संदीप पवार, मधुकर वायभट, लक्ष्मण जाधव आदी १५ पेक्षा जास्त वनविभागाचे कर्मचारी यांनी आटोकाट प्रयत्न करूनही आग आटोक्यात येण्यास ६ घंटे लागले. या आगीत शेकडो एक्करवरील झाडे, झुडपे जळून खाक झाली.

**वनविभागाच्या उपाययोजना अपुऱ्या आगीच्या घटना रोखण्यात वनविभागाला अपयश**

डोंगररांगांना आग लागण्याच्या घटना घडत असल्याने ही आग वनक्षेत्रात येऊ नये यासाठी वनविभागाकडून उपाययोजना केल्या जात आहेत. वनक्षेत्रात आग पसरू नये यासाठी फायर लाईन्स टाकले आहेत. गवत कापण्याचे काम केले जात आहे. तसेच आग आटोक्यात आणण्यासाठी कर्मचाऱ्यांना ब्लोअर मशीन दिलेल्या आहेत. या मशीनच्या सहाय्याने आग कशी नियंत्रणात आणावी यांचे प्रशिक्षण कर्मचाऱ्यांना देण्यात आल्याचे वनविभागाचे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडुन सांगण्यात येते. मात्र तरीही बीड जिल्ह्यातील आगीच्या घटनात दिवसेंदिवस वाढ होताना दिसत असुन वनविभागाचे प्रयत्न तोकडे पडल्याचे दिसून येत असल्याचे मत डॉ.गणेश ढवळे यांनी व्यक्त केले.



## महात्मा बसवेश्वर पुतळ्याभोवती सीसीटीव्ही, डोमची व्यवस्था करु : योगेश क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

शहरात असलेल्या महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्याची वारंवार होणारी विटंबना थांबविण्यासाठी चबुतऱ्याची उंची वाढवून सीसीटीव्ही कॅमेऱ्याची लवकरच व्यवस्था करुन पुतळ्याभोवती डोम बसविणार असल्याची घोषणा राष्ट्रवादी कॉंग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केली. वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त बुधवारी आयोजित अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी नगरसेवक प्रेम चांदणे, बाळू गुंजाळ, अशोक लोढा, प्रकाश कानगावकर, उत्तरेश्वरअप्पा कानडे, कपिलधार देवस्थानचे उपाध्यक्ष शिवशंकर भुरे, बाळूसेठ मिटकरी, अशोक शहागडकर तसेच समाजातील ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

प्रारंभी सकाळी अकरा वाजता डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते महात्मा बसवेश्वर महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने शिवशंकर भुरे, बाळूसेठ मिटकरी यांच्या हस्ते डॉ.क्षीरसागर यांच्यासह उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. पुढे डॉ.क्षीरसागर म्हणाले की, बीडच्या ऐतिहासिक चमणच्या विकासासाठी तीन कोटींचा आराखडा प्रस्तावित असून याला लवकरच मंजूरी मिळेल. यामध्ये महात्मा बसवेश्वर यांच्यासह परिसरातील पुतळ्याच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेऱ्यासह चबुतऱ्याची उंची वाढविण्यात येणार आहे. चमणच्या परिसरात असलेल्या दोन एकर जागेवर वॉकिंग ट्रॅक करण्याचा प्रस्ताव असल्याचे क्षीरसागर म्हणाले.

वीरशैव लिंगायत समाज हा शांत, संयमी समाज म्हणून ओळखला जातो. महात्मा बसवेश्वर हे लिंगायत समाजाचे धर्मगुरु आहेत. त्यांच्या विचारांची सर्वच समाजाला गरज असल्याचे ते म्हणाले. प्रास्ताविक वालवकर यांनी केले. यावेळी वीरशैव समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कोरोनाच्या काळात महाभयंकर संकट आल्यानंतर ते स्वतःचे जीवन परवा न करता डॉक्टर बाळासाहेब गिरहे यांनी रुग्णांवर उपचार केले. त्यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना पिंपरी गावचे सरपंच मोहन आमटे, घाटा गावचे सरपंच प्रल्हाद मुळीक, युवा नेते विकास अण्णा आमटे व दैनिक आरंभीच्या आष्टी तालुका प्रतिनिधी सुरेश कांबळे यांनी त्यांचा सत्कार केला.

## लिंबागणेश येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. दि.३० बुधवार रोजी सकाळी पंचशील नगर येथे सरपंच बालासाहेब जाधव यांच्या हस्ते पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. उपसरपंच बाळकृष्ण थोरात, ग्रामपंचायत सदस्य, मान्यवरांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून बौद्ध वंदना घेऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे आयोजन भिम टायगर ग्रुप बीड जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ, सुरेश निर्मळ केले. अध्यक्षस्थानी असलेल्या रविंद्र निर्मळ यांनी भारत देशातील सर्व नागरिकांना सामाजिक न्याय मिळवून देणाऱ्यासाठी देशाला बाबासाहेबांच्या विचारांची गरज असल्याचे प्रतिपादन केले. सायंकाळी ५ वाजता गावातील प्रमुख चौकातुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची निळ्या ध्वजांनी सुशोभित सजवलेल्या रथातून मिरवणूक काढण्यात आली. आदल्यादिवशी भिमगीत गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे आयोजन जितेंद्र निर्मळ, बालाजी निर्मळ, अरूण निर्मळ, पप्पू निर्मळ यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक भिमजयंती उत्सव समितीचे अध्यक्ष शंकर निर्मळ, उपाध्यक्ष अमोल निर्मळ, सचिव स्वप्निल वक्ते, कोषाध्यक्ष स्वप्निल निर्मळ, सौरभ निर्मळ, तुळशीराम पवार, तुकाराम गायकवाड, प्रकाश निर्मळ, पोपट निर्मळ, ज्ञानोबा निर्मळ आदिच्या पुढाकाराने आयोजित कार्यक्रमात मोठ्या संख्येने ग्रामस्थांनी सहभागी होऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले.

## परभणी फाटा माजलगाव येथे डोक्यात दगडाने मारून गंभीर केल्याचे प्रकरणात आरोपीस जमीन मंजूर

माजलगाव । प्रतिनिधी

दिनांक २३/४/२०२५ रोजी सकाळी १० वाजता फिर्यादी गावाकडून माजलगाव येऊन परत गावी जाताना सिंधफणा पुलाजवळ थांबला तेव्हा ११.४५ चे सुमारास बायपासकडून एक तीन सीटर रिक्षा आल्याने मी



त्यास हात करून थांबवून त्यात बसलो त्यास मी लऊळ येथे नेऊन सोड तुला शंभर रुपये देतो तर रिक्षा गजानन हॉटेलसमोर थांबला रिक्षा चालकाने मला अगोदर शंभर रुपये दे असे म्हणाला तेव्हा मी त्यास गावाकडे सोड त्यानंतर मी तुला रिक्षाचे भाडे देईन या वरून त्या रिक्षावाल्याने मला रिक्षाचे खाली उतरण्यास सांगितले. तेव्हा त्या रिक्षावाल्याने मला चापट मारल्या तेव्हा माझे डोळ्याचा चष्मा खाली पडून फुटला. तेव्हा गजानन हॉटेलचे मालक प्रल्हाद विघ्ने हे तेथे आले व त्यांनी मला व रिक्षा चालकाला समजून सांगितले व भांडणाची सोडवा सोडव केली.त्यानंतर मी तेथून पाई गोविंद मोटर्स ट्रॅक्टर एजन्सी परभणी फाटा समोर थांबलो असताना दुपारी १२.००चे सुमारास रिक्षा चालकाने रिक्षा थांबून मला लाथ मारून खाली पाडले व हातातील दगडाने माझे डोक्यावर डावे बाजूस मारून गंभीर जखमी केले अशा फिर्यादीवरून दिनांक २४/४२०२४ रोजी आरोपीविरुद्ध ग्रामीण पोलिस स्टेशन माजलगाव येथे कलम ११८(२)११५(२)३५२ बी.एन.एस अन्वय गुन्हा दाखल करण्यात आला होता.

त्यानंतर आरोपी विकी अंबादास सानप यास ग्रामीण पोलीस स्टेशन माजलगाव यांनी दिनांक २५/४/२०२५ रोजी अटक केली होती त्यानंतर आरोपीचे वतीने मा प्रथमवर्ग न्यायादंडाधिकारी साहेब माजलगाव यांच्या न्यायालयात ॲड. आर के गवते यांचे मार्फत जमीन अर्ज दाखल केला होता. दिनांक २९/४/२०२५ रोजी सरकारी पक्षाच्या वतीने सदरचे प्रकरण हे अत्यात गंभीर स्वरूपाचे असून आरोपीस जमीन दिल्यास कायद्याचा धाक राहणार नाही, तसेच फिर्यादी हा डिस्चार्ज झालेला नसून संजीवनी हॉस्पिटल मध्ये उपचार चालू असून तो खूप सिरियस आहे त्यामुळे आरोपीस जमीन देण्यात येऊ नये असा युक्तिवाद करून जमीन अर्जावर आक्षेप घेतला ,परंतु आरोपीचे वतीने दाखल केलेले कागदपत्रांचे अवलोकांकरून व आरोपीचे वतीने केलेला कायदेशी युक्तिवाद गृहीत धरून आरोपीस मा. नायलयाने दिनांक२९/४/२०२५/ रोजी जामीन मंजूर केला. आरोपीचे वतीने ॲड. व्हि.बी. लवटे यांचे मार्गदर्शनाखाली ॲड आर.के.गवते यांनी काम पाहिले असून त्यांना ॲड एस.बी कुलकर्णी, ॲड एन.आर जावळे यांनी सहकार्य केले.

## शिक्षकांनी केला नवीन तंत्रज्ञानाचा अंगीकार; कोर्समध्ये यशस्वी शिक्षकांचा केला गौरव

शिरूर कासार । प्रतिनिधी

तालुक्यातील दहा शिक्षकांनी जिल्हा शिक्षण, प्रशिक्षण संस्था आणि जिल्हा परिषद, बीड यांचे वतीने शिक्षकांसाठी कोडींग कोर्ससाठी स्वेच्छेने सहभाग घेत यशस्वीपणे पूर्ण केला. या गुणवंत शिक्षकांचा गटशिक्षणाधिकारी प्रशांत शिंदे यांनी गटशिक्षणाधिकारी कार्यालयात सोमवार, दि.२८ रोजी सन्मान केला. तालुक्यातील यशस्वी शिक्षक डॉ. विठ्ठल जाधव (प्रा. शा. उकिर्डा) प्रदीप दुधाळ (प्रा.शा. ढेरकरवाडी) श्रीमंत तळेकर (मा.शा. फुलसांगवी) मीना दगडखैर (प्रा.शा. इंदूवासिनी देवी) संध्या कुलकर्णी (कें.प्रा.शा. हिवरसिंगा) स्वाती राऊत (रूपेवाडी) किशोर सुपेकर (प्रा.शा. लिंबा) गणेश शिंदे (प्रा.शा. राक्षसभूवन)




रामदास पाखरे (वडाचीवाडी) संगीता वारे (मा.शा. शिरूर) यांना सन्मानित करण्यात आले. नवनवीन काही घडत असेल तर ते शैक्षणिकदृष्ट्या हितावह आहे. शिक्षकांनी त्यांच्या या ज्ञान– तंत्रज्ञानाचा उपयोग विद्यार्थ्यांच्या हितासाठी करावा. अशी अपेक्षा प्रशांत शिंदे यांनी व्यक्त केली. नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग शिक्षणक्षेत्रात करण्यासाठी कोडींग कोर्सचे आयोजन करण्यात आले. स्वयं अध्ययन करून सर्व टास्क पूर्ण केले. कोर्समध्ये कोड तयार करणे, चित्रांचे संचलन, रचना करणे, आवाजाचे नियंत्रण, प्रात्यक्षिक कार्य आणि पूर्व, उत्तर चाचणी यांचा समावेश होता. दरम्यान कोडींग कोर्समध्ये साहित्यिक डॉ. विठ्ठल जाधव आणि प्रदीप दुधाळ यांनी जिल्ह्यात अव्वल प्राविण्य मिळविले. त्यांना अमॅझॉनच्या वतीने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांनी लॅपटॉप बक्षीस, प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले. यावेळी विजयकुमार गाडेकर, परसराम खेडकर, सुनिल खेडकर, नरेंद्र गीरी, लखूळ मुळे, विद्या पानगे, राम भोंडवे, भगवान गायकवाड यांची उपस्थिती होती.

## साबला ग्रामपंचायतच्या वतीने महाराष्ट्र दिनानिमित्त महिलांचा सत्कार संपन्न

केज । प्रतिनिधी

तालुक्यातील साबला येथील ग्रामपंचायत कार्यालयात महाराष्ट्र दिनानिमित्त प्रथम राष्ट्र पुरुषांच्या प्रतिमेचे पूजन उपसरपंच श्रीमती कचराबाई राजेंद्र सरवदे तसेच ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर पांचाळ, चेरमन उत्तमराव काकडे, मुख्याध्यापक धनराज धाट जिल्हा परिषद प्राथमिक शाळा साबला, अध्यक्ष शंकर नाईकनवरे शालेय व्यवस्थापन समिती जिल्हा परिषद प्राथमिक शाळा साबला, सहशिक्षिका श्रीमती वंदना फाटे, अंगणवाडी शिक्षिका सुनंदा काकडे, अंगणवाडी मदतनिस श्रीमती काशिबाई राऊत साबला, आरोग्य सेविका श्रीमती वर्षा काकडे, नवनिर्वाचित अंगणवाडी मदतनिस श्रीमती शोभा मुळे, ग्रामपंचायात कर्मचारी गुलाब मुळे, विश्वनाथ नाईकनवरे यांच्या हस्ते राष्ट्र पुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तसेच महाराष्ट्र दिनानिमित्त ग्रामपंचायत कार्यालयाचे ध्वजारोहन उपसरपंच श्रीमती कचराबाई राजेंद्र सरवदे यांच्या हस्ते करण्यात आले .

महिलांना महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालविकास विभाग महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार सन २०२४/२०२५ हा पुरस्कार ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने सामाजिक, राजकिय, धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनिय काम करणाऱ्या महिलांना ट्रॉफी, प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. त्यामध्ये श्रीमती आश्रुबाई श्रीमंत




काकडे, श्रीमती पारुबाई श्रीमंत नाईकनवरे या महिलांचा यामध्ये समावेश करण्यात आला आहे.

श्रीमती आश्रुबाई श्रीमंत काकडे यांच्या बाबतीत थोडक्यात माहिती अशी आहे. की त्या स्वतः ग्रामपंचायत सदस्य साबला. म्हणून राजकारणात सक्रिय आहेत. तसेच त्यांची दोन्हीही मुलं शिक्षण घेऊन वेगवेळ्या क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांचे थोरले चिरंजीव हे पुणे येथील पिंपरी चिंचवड येथे स्वतःचा फ्रुटचा व्यवसाय करतात. तर धाकले चिरंजीव हे मुंबई येथे राष्ट्रीय कृत बँकेत नोकरी करतात. त्याचप्रमाणे श्रीमती पारूबाई श्रीमंत नाईकनवरे यांचे पती देखील दोन वेळेस ग्रामपंचायत सदस्य म्हणून तर एक वेळेस सेवा सहकारी सोसायटी संचालक म्हणून त्यांनीही राजकीय क्षेत्रात काम केले आहे. त्यांच्याही मुलांनी शिक्षण घेऊन त्यांचीही दोन्ही मुलं हे वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यामध्ये त्यांचे थोरले चिरंजीव हे शिक्षण क्षेत्रात माध्यमिक शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. ते शिक्षण क्षेत्रात ज्ञानदान करण्याचे काम करतात, तर धाकले चिरंजीव हे पुणे येथील कंपनी मध्ये चांगल्या प्रकारच्या जॉबला आहेत.

या दोन्हीही महिलांची निवड करून त्यांचा सन्मान उपसरपंच कचराबाई राजेंद्र सरवदे, समाजसेवक नरहरी काकडे, ग्रामपंचायत अधिकारी तानाजी शिंपले, पोपट काकडे यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले, यावेळी राहुल मुळे, श्रीमंत नाईकनवरे, उमाशंकर शिंदे, श्रीमंत काकडे, राजेभाऊ काकडे, जालींदर मुळे, लक्ष्मण काकडे, उद्धव नाईकनवरे, माजी उपसरपंच अभिमान नाईकनवरे, भारत काकडे, माजी व्हाईस चेरमन आत्माराम काकडे, मेजर अशोक काकडे, चत्रभुज मुळे, रामचंद्र काकडे, सावताराम नाईकनवरे, अंगद काकडे, रामदास मुळे, पवन सरवदे, अंकुश काकडे, रामभाऊ काकडे, अनंत नाईकनवरे, धनेश्वर पांचाळ यावेळी गावातील इत्यादी नागरिक उपस्थित होते.



वडमावली विद्या प्रसारक मंडळाचे श्याम विद्यालय, श्याम कनिष्ठ महाविद्यालय व श्याम गदळे कला विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय दहिफळ वडमाऊली तालुका केज येथे महाराष्ट्र दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला त्यानंतर आम्ही सर्वजण एकाच कुटुंबाचे सदस्य आहोत असे एकतेचे दर्शन सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी घडवले. (छाया तात्यासाहेब डोईफोडे)

पान १ वरून...

### पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल

सुमित कैलास लांडगे याने पडले आहे. तात्या गवळी यांच्या किराणा दुकानाच्या समोरील भिंतीवरील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बॅनर सुमित लांडगे याने जाणीवपूर्वक फाडून महामानवाचा अवमान केला आहे.

सुमित लांडगे याने प्रदीप गायकवाड यांच्या गाडीचे वायफर तोडून नंतर महामानवांचे असलेले फोटोच्या बॅनर वर तात्या गवळीचा फोटो फाडून खाली नाचत आला. त्यावेळी येथून समोरून चार जण जाताना सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद झालेले आहेत. सदर प्रकरणातील सुमित लांडगे व त्याचे इतर चार साथीदार व मुख्य सूत्रधार कोण आहे याची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्यात यावी असे तात्या गवळी व प्रदीप गायकवाड यांनी पोलीस ठाणे केज येथे समक्ष हजर होऊन दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हेड कॉन्स्टेबल चौधरी हे करत आहेत.

### सूक्ष्म नियोजनातून जिल्ह्यात पक्षाची बांधणी आणखी मजबूत करा : ना. मुंडे

पक्ष संघटनेत काम करण्याचा अनुभव कार्यकर्त्यांसाठी अत्यंत महत्वाचा असतो. पक्षाची राष्ट्रीय सचिव म्हणून कामं करत असताना संघटनेत चांगले अनुभव आले. या अनुभवांचा वापर कार्यकर्त्यांनी लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी करावा. पुढील काळात एकत्र येऊन जिल्ह्यात बांधणी करा, लोकांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी आणि पक्ष वाढीसाठी समर्पित भावनेने कार्यरत राहा असा कानमंत्र यावेळी ना. पंकजाताई मुंडे यांनी दिला. याप्रसंगी भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, देविदास नागरगोजे, नवनाथ शिराळे, सतीश मुंडे, चंद्रकांत फड, अरूण राऊत, बाळासाहेब चोले आदी उपस्थित होते.

**नव्या अध्यक्षांचा सत्कार**

ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते यावेळी नवनियुक्त अध्यक्ष सचिन दाभाडे, राजेंद्र पवार, उध्दव रासकर (गेवराई), विनायक रत्नपारखी, रूपाली कचरे, अभिजित सोळंके (माजलगांव), संदीप काचगुंडे (धारूर), सुखदेव रेडे (वडवणी), संजय गंभीरे, गोकुळ कदम, संतोष भगत (अंबाजोगाई), भगवान केदार (केज), वसंत निर्मळ, राजेश गीते, उमाताई समशेट्टे (परळी), मनोज पाटील, अशोक लोढा, राणा डोईफोडे, अशोक रसाळ (बीड) यांचा सत्कार करण्यात आला. भाजपचे जिल्ह्यातील पदाधिकारी, कार्यकर्ते याप्रसंगी मोठया संख्येने उपस्थित होते.

# जयवंती नदीच्या जायमोक्याची संयुक्त पाहणी करून ८ दिवसाच्या आत अहवाल देवून अतिक्रमण काढू- मुख्याधिकारी प्रियंका टोंगे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

जयवंती नदीपात्रातील अतिक्रमण काढावे या मागणीसाठी मागील तीन दिवसापासून अभिजीत लोमटे यांचे आमरण उपोषण चालू होते नगरपरिषद च्या मुख्याधिकारी यांनी मागण्या मान्य करत लेखी आश्वासन दिल्यानंतर आमरण उपोषण तात्पुरते स्थगित केले असून अहवाल प्राप्त होईपर्यंत साखळी उपोषण करण्याचा निर्णय घेतला आहे.



अंबाजोगाई शहरात धन दांडग्यांनी अतिक्रमण केल्याने नदीचा प्रवाह बंद झाला असून हे अतिक्रमण तात्काळ काढण्यात यावे वंदीचा प्रवाह मोकळा करावा तसेच जावक क्रमांक ८८० उपविभागीय अधिकारी यांनी सहाय्यक आयुक्त यांच्या पत्राचा संदर्भ देत तहसीलदार व मुख्याधिकारी यांना जाय मोक्यावर जाऊन पाहणी करून अतिक्रमण काढण्याचे निर्देश दिले होते. या निर्देशाचे पालन करावे, या मागणीसाठी डिजिटल मीडिया परिषद अंबाजोगाई चे अध्यक्ष अभिजीत लोमटे हे २९ एप्रिल आमरण उपोषणास बसले होते.

या उपोषणास अंबाजोगाईतील सर्वसाधारण नागरिक तसेच सर्वपक्षीय राजकीय नेत्यांनी उपोषण स्थळी येत पाठिंबा दर्शवला उपोषणाच्या तिसऱ्या दिवशी अंबाजोगाई नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी प्रियंका टोंगे, कार्यालयीन अधीक्षक रमेश सोनकांबळे, स्वच्छता निरीक्षक अनंत वेडे यांनी उपोषण कर्ते अभिजीत लोमटे यांची भेट घेत जा क्र ८८० उपविभागीय अधिकारी यांच्या निर्देशानुसार जाय मोक्यावर जाऊन तहसीलदार व मुख्याधिकारी संयुक्त पाहणी करून जयवंती नदी पात्रातील अधिकृत परवानधारक व अनधिकृत बांधकामाची माहिती अहवाल आठ दिवसाच्या आत सदरील अहवाल तयार करून एक प्रत अभिजीत लोमटे देण्याचे लेखी आश्वासन दिले व भूमी अभिलेख कार्यालयास तात्काळ वीज भरून नदी पात्राची मोजणी करण्याचे तसेच मुख्य रस्त्यावरील जयवंती नदीच्या पुलाखालील दोन कनग्या बुजवून नदीचा प्रवाह रोखला आहे सदरील पुलाखालील कनग्या रिकाम्या करून नदीचा प्रवाह पूर्ववत करण्याची हमी दिल्याने माननीय मुख्य अधिकारी प्रियंका टोंगे यांच्या विनंतीवरून व लेखी आश्वासनानंतर डिजिटल मीडिया परिषद चे अध्यक्ष अभिजीत लोमटे यांनी आमरण उपोषण तात्पुरते स्थगित करून जोपर्यंत अहवाल प्राप्त होत नाही तोपर्यंत डिजिटल मीडिया परिषदेचे सर्व पदाधिकारी व सदस्य यांच्या वतीने नगरपरिषद कार्यालया समोर साखळी उपोषण करण्याचा निर्णय घेतला आहे.

डिजिटल मीडिया परिषदेचे अध्यक्ष अभिजीत लोमटे यांचे आमरण उपोषण सोडवताना माजी आमदार पृथ्वीराज साठे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष अमर देशमुख, काँग्रेसचे शहराध्यक्ष असेफोद्दीन खतीब, ज्येष्ठ पत्रकार सुदर्शन रापतवार, अ.र पटेल, सतीश मोरे, सुधाकर देशमुख, वंचित चे गोविंद मस्के, आरेफ सिद्दीकी, संजय जोगदंड, अहमद पठाण, मनोज कोकणे, योगेश डाके, उत्तरेश्वर शिंदे व डिजिटल मीडियाचे सर्व सदस्य उपस्थित होते.

## महिला आत्मभान प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन

# मुलींच्या संरक्षणाबाबतची मनातील भिती दुर होण्याचे काम शिबिरातून होईल : आ. मुंदडा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

कुठल्याही पालकाच्या मनात मुलींच्या संरक्षणा साठीची भिती असते ही भिती दुर करण्याचे काम अशा शिबीराच्या माध्यमातून निश्चित होईल आणि त्या आत्मनिर्भर बनतील असे मत केज विधानसभा मतदार संघाच्या आ.नमिता मुंदडा यांनी व्यक्त केले. त्या योगेश्वरी क्रीडा प्रबोधिनी आणि श्रीमती कमल खुरसाळे स्मृती न्यास यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महिला आत्मभान प्रशिक्षण शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होत्या. अध्यक्षस्थानी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर होते. व्यासपीठावर सचिव कमलाकर चौसाळकर, संचालक आर. व्ही. सोनवळकर, लातुर येथील सामाजिक कार्यकर्त्या रुक्साना मुल्ला, प्राचार्य डॉ. एम.व्ही.कानेटकर, मुख्याध्यापिका मीना कुलकर्णी आदीची उपस्थिती होती.



पुढे बोलताना आ.मुंदडा म्हणाल्या की, योगेश्वरी शिक्षण संस्थेअंतर्गतच्या या शिबीरासाठी मुलींची संख्या मोठ्या प्रमाणात असून समाजभान जागृत होण्यासाठी आणि इथे शिकलेल्या गोष्टींचा भविष्यात वापर करण्यासाठी या शिबीराची सुरुवात झाल्याचे सांगून किशोरवयीन मुलांसाठीही एखादे शिबीर सुरू करावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. रूक्साना मुल्ला म्हणाल्या की, सोळा वर्षाचे वय म्हणजे आत्मभान येण्याचे वय असून पुढे मला माणुस म्हणून मला कसे जगता येईल, माझा विकास कसा होईल असा विचार अंगी रूजावा समाजामध्ये स्वतःची ओळख निर्माण होण्यासाठी काही तरी करावे लागते या साठी अशा शिबीराची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले व भारतीय संविधानातील मानवी मुल्यांचे पालन करण्याची प्रतिज्ञा दिली.

मुलींनी स्वतःमधील क्षमता ओळखून या क्षमतांचा पुरेपूर वापर केला पाहीजे शिवाय आयुष्यात सकारात्मक बदल करावा, असे आवाहन अध्यक्षीय समारोपात बर्दापूरकर यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्तविक समन्वयक प्रा.डॉ.प्रविण भोसले यांनी केले. संचालन प्रा.सचिन कऱ्हाड यांनी तर उपस्थितांचे आभार शिबीर प्रमुख डॉ.सारिका जगताप यांनी मानले. यावेळी सल्लागार एन.के.गोळेगांवकर शिबीर समन्वयक ॲड.कल्याणी विर्धे आदीसह संस्थेचे पदाधिकारी, संचालक, सर्व विभागातील कर्मचारी, शिबिरातील विद्यार्थिनी उपस्थित होते.

# चौसाळा येथील छत्रपती संभाजी महाराज सार्वजनिक जयंतीच्या अध्यक्षपदी समर्थ नाईकवाडे तर उपाध्यक्षपदी बबलु शिंदे



चौसाळा । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील चौसाळा येथे प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी छत्रपती संभाजी महाराज सार्वजनिक जयंतीच्या अध्यक्षपदी समर्थ नाईकवाडे तर उपाध्यक्षपदी बबलु शिंदे व सचिवपदी आदित्य हावळे तर कोषाध्यक्षपदी अमोल कांबळे यांची एकमताने निवड करण्यात आली तर मार्गदर्शकपदी संदेश खिवसरा, अंगद शिंदे, विजयराजे शिंदे, अतुल शिंदे, प्रदीप जोगदंड, मधुकर तोडकर, राजेश (अप्पा) नाईकवाडे, तुकाराम जोगदंड, नानासाहेब शिंदे यांची निवड करण्यात आली.

यावेळी सुधाकर गुंजाळ, स्वप्निल हुंबे, तुषार नाईकवाडे, गणेश औताडे, रोहित जोगदंड, शैलेश जोगदंड, सुरज जोगदंड, सचिन नाईकवाडे, बंटी शिंदे, पंकज शिंदे, उमेश जोगदंड, अमर नाईकवाडे, सागर शिंदे, विकास शिंदे, विठ्ठल कळासे, विकास नाईकवाडे, प्रसाद जालन, जगदीश हुंबे, सुरेश साळुंखे, सचिन इटकर, चंदन राहीज, युवराज जोगदंड, अक्षय कळासे, ज्ञानेश्वर जोगदंड, कृष्णा जोगदंड, श्रीजीत गुंठाळ, प्रताप शिंदे, सुरज हुंबे, रामु जोगदंड, कोंडीराम जोगदंड, मोहन शिंदे, नितीन शिंदे, समाधान नाईकवाडे यांच्यासह अनेक शिवभक्त मोठया सख्येने उपस्थित होते.

# शेतकऱ्यांना योग्य मावेजा न दिल्यामुळे कार्यकारी अभियंता सुरेंद्र पवार यांना अटक करण्याचे न्यायालयाचे आदेश

## अँड.उषाताई ठोंबरे यांच्या युक्तीवादावरून जिल्हा न्यायाधीशांचा महत्त्वपूर्ण हुकूम

बीड । प्रतिनिधी

केज तालुक्यातील जाधवजवळा येथील चत्रभूज काळे आणि इतर शेतकऱ्यांची जमीन महाराष्ट्र शासनाने बृहत लघुसिंचन तलाव केजच्या कालवा बांधकामासाठी संपादित केली होती. मात्र शेतकऱ्यांच्या जमिनीस अत्यंत कमी मावेजा दिला म्हणून बीड इरिगेशन डिव्हिजन बीड यांच्याविरुद्ध न्यायालयात दावा दाखल करण्यात आला होता. बीडचे कार्यकारी अभियंता सुरेंद्र पवार यांनी शेतकऱ्यांना आलेला पूर्ण मावेजा न देता त्यांच्यावर अन्याय केला आहे, त्यामुळे कार्यकारी अभियंता यांना दोषी ठरवून अटक करण्याचे आदेश न्यायालयाने द्यावेत असा युक्तिवाद अँड उषाताई ठोंबरे यांचा ग्राह्य धरून जिल्हा न्यायाधीश प्रथम यांनी बीड इरिगेशन विभागाचे कार्यकारी अभियंता सुरेंद्र पवार यांना अटक करण्याचा हुकूम पारित केल्याने प्रशासनात खळबळ उडाली आहे.



या प्रकरणाची थोडक्यात माहिती अशी की, महाराष्ट्र शासनाने केज तालुक्यातील जाधवजवळा परिसरातील शेतकऱ्यांची जमीन बृहत लघु सिंचन तलाव तालुका केज जिल्हा बीडच्या कालवा बांधकामासाठी संपादित केली होती. यामध्ये छत्रभूज काळे सह इतर शेतकऱ्यांची जमीन गेली होती. महाराष्ट्र शासनाने संपादित केलेल्या जमिनीचा अत्यंत कमी मावेजा संबंधित शेतकऱ्यांना दिला. यामुळे छत्रभुज काळे सह इतर शेतकरी न्यायालयामध्ये बीड इरिगेशन डिव्हिजन बीडच्या विरोधात कलम १८ भूसंपादन कायद्याप्रमाणे वाढीव मावेजासाठी दावा दाखल करून न्याय हक्कासाठी लढत होते. चत्रभुज काळे व इतर शेतकऱ्यांची बाजू प्रसिद्ध विधीज्ञ अँड उषाताई ठोंबरे यांनी वस्तुस्थिती आणि पुराव्यानुसार मागणी करून युक्तिवाद केला. यानुसार या दाव्याचा निकाल जिल्हा न्यायाधीश प्रथम यांनी दिला.

या प्रकरणांमध्ये वसुलीचा दावा दरखास्त क्रमांक ४३१/२०२३ जिल्हा न्यायाधीश प्रथम यांच्या न्यायालयात प्रलंबित असून संबंधित न्यायालयात चत्रभुज काळे व इतरांकडून विविध कलमा अंतर्गत अर्ज दिलेले आहेत. मात्र शासनाने संपूर्ण मावेजाची रक्कम भरलेली नाही. याला कार्यकारी अभियंता सुरेंद्र नानासाहेब पवार हे दोषी असल्याने त्यांच्यावर अटकेची कारवाई करावी अशी मागणी आणि युक्तिवाद अँड उषाताई ठोंबरे यांनी केला.तो ग्राह्य धरून जिल्हा न्यायाधीश प्रथम यांनी बीड इरिगेशन डिव्हिजनचे कार्यकारी अभियंता सुरेंद्र पवार यांना अटक करण्याचा हुकूम पारित केल्याने प्रशासनामध्ये खळबळ उडाली आहे. किमान आता तरी शासनाने शेतकऱ्यांचा योग्य मावेजा तात्काळ द्यावा अशी मागणी संबंधित पीडित शेतकऱ्यांनी केली आहे.

# माजलगाव धरणाच्या निसर्गरम्य वातावरणात क्रिकेट स्पर्धा

## आदर्श देवगावच्या युवकांचे उत्कृष्ट नियोजन
## क्रिकेट प्रीमियर लीग शुभारंभ उद्घाटन कार्यक्रम संपन्न



वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील आदर्श देवगाव या ठिकाणी भव्य क्रिकेट प्रीमियर लीग चा उद्घाटन शुभारंभ कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी या उद्घाटन कार्यक्रम प्रसंगी उपस्थित, परडी माटेगाव चे विद्यमान सरपंच माधव शेंडगे, शेतकरी नेते जगदीश फरताडे, आदर्श देवगाव चे माजी सरपंच माऊली सुरवसे, विद्यमान सरपंच मुकुंद सुरवसे, उपसरपंच तथा सामाजिक कार्यकर्ते महादेव सुरवसे, युवा पत्रकार अंकुश गवळी. माजी सरपंच लखन महागोविंद, सामाजिक कार्यकर्ते विष्णुपंत नेमाटे. सखाराम सुरवसे, सचिन सुरवसे, राहुल सुरवसे, अंकुश ईतापुरे. ह.भ.प. मच्छिंद्रनाथ महाराज गवळी गोविंद महाराज सुरवसे आदी मान्यवरांच्या उपस्थिती क्रिकेट प्रीमियर लीग उद्घाटन समारंभ कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी माजलगाव धरणाच्या निसर्गरम्य वातावरणात क्रिकेट स्पर्धा खूप मोठ्या प्रमाणात पार पडत आहेत, यावेळी पंचक्रोशीतील क्रिकेट प्रेमींनी युवकांनी मोठ्या संख्येने माजलगावच्या धरणाच्या परिसरात क्रिकेट स्पर्धा पाहण्याकरिता यावे व क्रिकेट प्रेमींना वाव मिळवण्यासाठी तरुणांनी क्रिकेट प्रेमींनी यावे, असे आव्हान आयोजक तथा गावातील युवकांनी केले आहे.



आज बीड शहर पोलीस स्टेशन येथे तालुकास्तरीय शांतता समितीची पोलीस अधीक्षक श्री कावत साहेब यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली होती. या बैठकीमध्ये आपले विचार मांडताना शांतता समितीचे सदस्य मुसाखान पठाण यांनी बीड शहरातील बंद पोलीस चौकी कोतवाली वेस जुना बाजार चौकी, माळीवेस पोलीस चौकी व बीड शहरातील दोन मोठे कॉलेज मिलिया कॉलेज व बलभीम कॉलेज येथे किल्ला मैदान येथील असलेली पोलीस चौकी लवकरात लवकर चालू करण्यात यावे अशी सूचना शांतता समितीचे सदस्य मुसाखान पठाण यांनी केली आहे.

# मधुकर आदमाने यांचा संघर्ष इतरांसाठी प्रेरणादायी : रमेशराव आडसकर

केज । प्रतिनिधी

विद्यार्थी घडविण्यासाठी मधूकर आदमाने यांनी खुप परिश्रम घेतले. पुर्वी संघर्ष करण्याची सवय शिक्षकांमध्ये होती. त्यांचे विद्यार्थी आज ही मोठ्या पदावर आहेत. आदमाने यांचा संघर्ष इतरांसाठी प्रेरणादायी असल्याचे राष्ट्रवादी कॉग्रेसचे नेते रमेशराव आडसकर यांनी सांगितले. घागरवाडा जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक मधुकर आदमाने यांचा सेवापूर्ती कार्यक्रम मंगळवारी धारूर येथे पार पडला. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून राष्ट्रवादी कॉग्रेसचे नेते रमेशराव आडसकर होते, तर प्रमूख पाहुणे म्हणून जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी शिवाजीराव अंडील, गणेश गिरी, सभापती हनुमंत नागरगोजे, प्रा.ईश्वर मुंडे, सय्यद हाकीम, शिवराज गडदे, श्री.कोकणे यांची प्रमूख उपस्थिती होती.




यावेळी श्री. रमेशराव आडसकर म्हणाले की, ज्या आपुलकीने शिक्षकांनी शाळा सांभाळल्या तो काळ आता पुढील काळात पाहण्यास मिळणार नाही. पुर्वी संघर्ष करण्याची सवय शिक्षकांमध्ये होती तो संघर्ष मुधुकर आदमाने यांनी केला आहे. तो संघर्ष भाविष्यात पाहवयास मिळणार नाही. जिल्हा परिषदेचा शिक्षक हा सक्षम आहे. इंग्रजी शाळेचा शिक्षक असक्षम आहे. यावर कधी खरं बोलावेसे वाटते. प्रत्येकाला सेवानिवृत्त व्हावे लागते. मधुकर आदमाने यांनी आदर्श काम केल्याचेही रमेश आडसकर यांनी सांगितले. प्रा.ईश्वर मुंडे, हनुमंत नागरगोजे यांनी यावेळी मार्गदर्शन केले. यावेळी प्रमुख उपस्थितांच्या हस्ते मधुकर आदमाने यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षक रमेश सूर्यवंशी यांनी केले. निरोप समारंभास धारूर तालुक्यातील मोठ्या संख्येने मुख्याध्यापक, शिक्षक उपस्थित होते.

# जातनिहाय जनगणना हे काँग्रेसच्या मागणीचे यश : खा.रजनीताई पाटील

केज । प्रतिनिधी

देशात जात निहाय जनगणना करण्यात यावी ही काँग्रेसची मागणी होती. हा निर्णय काँग्रेसच्या दबाव तंत्रामुळेच घेण्यात आला आहे, अशी प्रतिक्रिया राज्यसभेच्या खा.रजनीताई अशोकराव पाटील यांनी दिली.



केंद्र सरकारने जात निहाय जनगणना करण्याचा निर्णय जाहीर केला हा निर्णय बिहारच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून घेण्यात आला आहे. भाजपने यापूर्वी कधीही जनगणने बाबत ब्र शब्द उच्चारला नव्हता. काँग्रेसने याबाबत कायम ठाम भूमिका घेतली होती. राहुल गांधीनी जात निहाय जनगणना करावी यासाठी आक्रमकपणे संसदेत भूमिका मांडली होती. जनतेला माहित आहे हा निर्णय काँग्रेसच्या दबावामुळेच घ्यावा लागलेला आहे. भाजपचा चेहरा जनतेला माहित आहे अशी प्रतिक्रिया खा.पाटील यांनी दिली.

# बनसारोळा येथे मोफत पाणपोईचा शुभारंभ; राजपाल काकडे यांच्या वतीने मोफत पाणपोई

केज । प्रतिनिधी

तीव्र उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर युवा नेते राजपाल भैया काकडे यांच्या वतीने बनसारोळा येथील बसस्थानक परिसरात मोफत पाणपोई सुरू करण्यात आली आहे. या पाणपोईवर नागरीकांना थंडगार जारचे पाणी पिण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आले आहे. त्यामुळे उन्हाळ्यात थंड पिण्याच्या पाण्याची मोफत सोय झाल्याने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी मदत झाली आहे.



या पाणपोईचा शुभारंभ जेष्ठ समाजसेवक नंदकिशोर काकाजी मुंदडा यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. तर श्रीगुरू पादुका मठ, चनईचे समीर दादा भास्करे, ह.भ.प समाधान महाराज गोरे, बजरंग बप्पा काकडे, माजी सभापती नेताजी पापा शिंदे, निषाद अकॅडमीचे प्रकाश बोरगावकर, अंबा साखर कारखान्याचे माजी संचालक अशोकराव काकडे, दत्ता आण्णा काकडे, राजपाल भैया काकडेआदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी चंद्रकांत धायगुडे, प्रवीण बासटवार, बाळासाहेब यादव, धनराज लाटे, विवेक कदम, रमेश पुजारी, वसंत वाघमारे, प्रवीण आदमाने, अनिक्त फरकेयांच्यासह गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रिटायर्ड फौजीची दलित महिलेस बेदम मारहाण

## आंबेडकरी जनतेत प्रचंड संताप



बीड । प्रतिनिधी

एका दलित महिलेस घरासमोर राहणाऱ्या रिटायर्ड फौजीने बेदम मारहाण केली असून उपचारासाठी त्या महिलेस जिल्हा शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सविस्तर वृत्तांत असा कि महात्मा फुलेनगर, धानोरा रोड बीड या ठिकानी शिक्षक असलेले अंकुश कोरडे व रिटायर्ड फौजी वसंत खेडकर हे समोरासमोर राहतात, गत दोन वर्षापासून किरकोळ कारणांवरून वसंत खेडकर हे कोरडे दाम्पत्यास जानिवपूर्वक त्रास देत आहेत.

बुधवार दिनांक ३० एप्रिल रोजी असेच कुठलेतरी कारण काढून खेडकर हे कोरडे यांच्या मुलांना रागावत होते. त्याबाबत घराबाहेर येवून कोरडे यांच्या पत्नी दिक्षा यांनी खेडकर यांना विचारताच मी तुझ्या मुलांच्या अंगावर गाडी घालीन अशी धमकी देवून त्यांनी दिक्षा कोरडे यांचे केस पकडून त्यांचे डोके खेडकर यांनी त्यांच्या गेटवर आपटले तेव्हा ते मोठ्याने ओरडून म्हणत होते तुम्ही महाराचे लोक खुप माजलात तुमचा माज उतरायला मला वेळ लागणार नाही मी आर्मीत नोकरी केली आहे. तुम्हा महारगाडयांना संपवायला मला वेळ लागणार नाही, तुम्ही आमची बराबरी करता काय अस बरच काही ते बोलत होते त्यावेळी त्यांची पत्नी पुष्पा खेडकर हिनेसुद्धा दिक्षा कोरडे यांना मारहाण केली आणि वसंत खेडकर यांनी दिक्षा यांना लज्जा वाटेल अशा ठिकानी त्यांना स्पर्श करून त्यांचा जानिवपुर्वक विनयभंग केला.
शिवाजी नगर पोलीस ठाण्यात विनयभंगा सह भारतीय न्याय संहितेच्या अनेक कलमाने आणि क्ट्रॉसिटी अधिनियमाने वसंत खेडकर व इतरा विरुद्ध गुन्हा दाखल झाला असून पोलीस तपास करीत आहेत. काल रुग्णालयात जावून अनेक पक्ष संघटनांच्या नेत्यांनी जखमी दिक्षा कोरडे यांची भेट घेवून त्यांना धिर दिला आहे आणि घटणेबाबत संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत.

# चारचाकी पलटी झाली; जखमी मजुरांचा आक्रोश

## कामगार दिनी मजुराच्या वाहनाला अपघात; १८ गंभीर जखमी, तिघांचा मृत्यू

आष्टी । प्रतिनिधी

नेहमीप्रमाणे घरातून आवरून पिकअप मध्ये बसून कांदा भरण्यासाठी निघालेल्या वाहनाचे पुढचे टायर अचानक फुटल्याने झालेल्या अपघातात तीन मजुरांचा मृत्यू तर १८ गंभीर जखमी झाल्याची घटना कडा-धामणगाव रोडवरील खोल ओढ्यात गुरुवारी सकाळच्या दरम्यान घडली. श्रावणी विक्रम महाजन वय वर्ष १४, अजित विठ्ठल महाजन वय वर्ष १४, ऋतुजा सतिष महाजन वय वर्ष १६ अशी मृतांची नावे आहेत.



आष्टी तालुक्यातील वंजारवाडी येथील महिला, मुली व तरूण असे २१ ते २२ मजुर कांदा भरण्यासाठी वाडीतीलच पिकअप मध्ये बसून हिवरा येथे जात असताना अचानक पिकअप चे पुढील टायर फुटून झालेल्या अपघातात १८ जण गंभीर जखमी तर तीन जणांचा मृत्यू झाल्याची घटना गुरूवारी सकाळी साडेदहा ते अकराच्या दरम्यान कडा-धामणगाव रोडवरील खोल ओढ्यात घडली. जखमींवर कडा, अहिल्यानगर येथील रूग्णालयात उपचार सुरू आहेत. तर शोकाकुल वातावरणात मयतावर वंजारवाडी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. या घटनेने वंजारवाडीसह तालुक्यात हळहळ व्यक्त होत आहे.



# उष्णतेची लाट परळीत बीड रोडवर ट्रक वाहनाने घेतला पेठ

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात उष्णतेची लाट परळी शहरातील बीड रोडवर वाहनाने घेतला पेट यामध्ये कुठलीही हानी झाली नाही. १७ मे पर्यंत मराठवाड्यात उष्णतेची लाट राहणार असल्यामुळे नागरिकांनी बाहेर पडते वेळेस आपल्या स्वतःची काळजी घ्यावी व सोबत छत्री व पाण्याची बॉटल असावी व त्यासाठी आपण आपल्या दैनंदिन कामाच्या वेळ बदलून आपण सर्वांनी सकाळी दहा व दुपारच्या नंतर आपण बाजारपेठेत जावे यासाठी नागरिकांनी प्रयत्न करावे व उष्णतेचा आकडा ४३ पार केलेला आहे.
यावेळी परळीहून बीड कडे जाणारा ट्रकभर वेगात असताना उष्णतेमुळे आपोआप पेट घेतला होता पूर्ण ट्रकला जाळ लागला आहे. त्यामुळेच नागरिकांनी स्वतःकडे लक्ष द्यावे व नागरिकांनी बाहेर पडू नये.

# बिडीओ दिवाणे मॅडम घरकुल विभागाच्या कांदे मॅडम यांना आवर घाला?

केज । प्रतिनिधी

एका घरकुलासाठी तुटपुंजा निधी मिळतो त्यात इंजिनीयर कांदे मॅडम यांच्याकडून एका घरकुलासाठी दहा हजार रुपये रेट घेतला जातो असे चर्चासत्र नागरिकांमध्ये चालू आहे. केज नगरपंचायतीच्या घरकुल विभागामध्ये कार्यरत असलेल्या इंजिनियर कांदे मॅडम मनमानी कारभार करत असल्याचे नागरिकांमध्ये बोलले जाते. एका घरकुलासाठी तुटपुंजा निधी मिळत असून त्यात अशा अधिकाऱ्यांच्या लाचखोरीपणामुळे घरकुल उभारणीला खूप मोठी अडचण निर्माण होत असून गरीब लाभार्थी यामध्ये भरडला जात आहे.
त्यामुळे केज पंचायत समितीच्या बीडिओ मॅडम आपण स्वतः लक्ष घालून लाचखोरी करणाऱ्या अशा कर्मचाऱ्यावर कारवाई करायला हवी. जर



आपण यामध्ये लक्ष घालत नसाल, तर आपल्यालाही यातला हिस्सा पोहोच होतो की काय अशी शंका येथील नागरिकांमधून उपस्थित होऊ शकते. इंजिनीयर कांदे मॅडम या पंचायत समितीत मनमानी कारभार करत असून घरकुल लाभार्थ्यांचे हप्ते अडवून कामात अडथळा निर्माण करण्याचे काम त्या करत आहेत. ज्या ठिकाणी पैसे मिळणार असतील तेथे रात्री सात-आठ वाजता मॅपिंग करण्यासाठी जातात. अन्यथा लोकांचे कॉल देखील उचलत नाहीत. या संबंधात कोणी काही विचारले तर उडवा उडवीची उत्तरे दिली जातात.
आपण अधिकारी असून आपल्या कार्यालयाचे काही नियम असतात त्या नियमानुसारच कामकाज व्हायला हवे. परंतु तसे होताना दिसत नाही. वरिष्ठ अधिकारी म्हणून बीडिओ मॅडम आपण यामध्ये लक्ष घालून हा प्रकार थांबवायला हवा. अशा लाचखोर अधिकाऱ्यांचे बँक स्टेटमेंट चेक करून त्यांच्यावर योग्य ती कारवाई करायला हवी. इंजिनीयर कांदे मॅडम यांची तात्काळ बदली करण्यात यावी अशी मागणी जनतेतून होत आहे याची दखल व्हिडिओ मॅडम यांनी त्वरित घ्यावी.

# अंबाजोगाई तालुक्यातील येल्डा येथे वृद्ध महिलेचा दगडाने ठेचून खून

अंबाजोगाई । प्रतिनिधी



अंबाजोगाई तालुक्यातील येल्डा येथे शुक्रवारी एका वृद्ध महिलेचा निर्घृण खून झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. मृत महिलेचे नाव चोत्राबाई भानुदास सोन्नर (वय अंदाजे ७२ वर्षे) असे असून याप्रकरणी त्यांच्या मुलावरच संशयाची सुई आहे.
प्राथमिक माहितीनुसार, चोत्राबाई यांचा खून दगडाने ठेचून करण्यात आला असून, ही घटना आज सकाळी उघडकीस आली. घटनेची माहिती मिळताच अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्याचे कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले आहेत. सध्या पोलिसांकडून घटनास्थळाची पाहणी करण्यात येत आहे. याप्रकरणी पोलिसांनी चोत्राबाई यांचा मुलगा अमृत भानुदास सोन्नर यास ताब्यात घेतले असून तपास सुरू आहे. या घटनेमुळे येल्डा गावात खळबळ उडाली आहे.

# खांडवी येथे कामगार एकता युनियन शाखेची स्थापना

जालना । प्रतिनिधी

खांडवी तालुका परतुर या ठिकाणी कामगार आयुक्त युनियनची शाखेची स्थापना झाली आहे. अध्यक्ष सुखदेव बरकुले, उपाध्यक्ष बाळासाहेब बरकुले, सचिव तुकाराम भारसाकळे, सल्लागार अर्जुन भारसाकळे यांची निवड झाली आहे.
कामगार एकता युनियन मागील ८ वर्षापासून विकासात्मक / शासन निर्णयातून वंचित राहिलेल्या घटकांसोबत कार्यरत आहोत. घरेलू महिला कामगार,पथविक्रेते, आणि नाका कामगार प्रस्थापित असंघटीत कामगार वर्गाला, कामगारांच्या अधिकाराची जाणीव करून देणे आणि अधिकार समजावून त्यांचे सक्षमीकरण करणे, ही महत्वाची भूमिका पार पाडत आहे. लोकांचे संघटन करून लोक संघटनेची बांधणी करणे आणि लोकानी लोकांसाठी संघटनारूपी एकत्र येऊन सुरु असलेल्या विकासाची व बदलावाची चर्चा, संवाद, विचार घडवून आणणे हा आमचा उद्देश आहे. उपस्थिती कामगार एकता युनियन तालुका अध्यक्षा विठ्ठल भारसाखळे जिल्हाध्यक्ष सुखदेव घोडे रतीव पाटील आणि सतीश लोंढे यांनी निवड झालेल्या कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले.

# सौर ऊर्जा प्रकल्पामुळे स्थानिक शेतकऱ्यांना आधार मिळाला : खा.रजनीताई पाटील

## उमरी शिवारात सौर ऊर्जा प्रकल्पाचा शुभारंभ

केज । प्रतिनिधी

सौर ऊर्जा प्रकल्पामुळे स्थानिक शेतकऱ्यांना आधार मिळाला आहे. सौर ऊर्जा ही काळाची गरज आहे. शाश्वत विकासासाठी असे प्रकल्प उभारले पाहिजेत, असे मत खा. रजनीताई पाटील यांनी केले. त्या उमरी शिवारातील गंगा माऊली शुगर अँड अलाईमेंट अंतर्गतचा ३ मॅगावॅट सौर ऊर्जा प्रकल्पाचा शुभारंभ मंगळवार दि.२९ एप्रिल रोजी झाला. यावेळी त्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या. यावेळी गंगा माऊली शुगरचे चेअरमन लक्ष्मणराव मोरे, माजी नगराध्यक्ष आदित्य पाटील, कॉंग्रेसचे बीड जिल्हाध्यक्ष राहुल भैय्या




सोनवणे, हनुमंत मोरे, बाबाराजे देशमुख, उमरी चे सरपंच अमोल मुळे, उपकार्यकारी अभियंता श्री.सय्यद, महेश अंडील, आदित्य ग्रीन एनर्जीचे जयेश बजाज, स्टेट बँक ऑफ इंडिया चे मनदीप वर्मा, गंगा माऊली उद्योग समूहाचे प्रवीण मोरे, अविनाश मोरे, तेजस्विनी पाटील, देविका पाटील, रेवती सोनवणे आदींची उपस्थिती होती. उमरी गावकऱ्यांच्या वतीने शिवारात प्रकल्प उभा केल्यामुळे खा. रजनीताई पाटील, लक्ष्मणराव मोरे यांचा सत्कार करण्यात आला.
यावेळी बोलताना राहुल सोनवणे म्हणाले खा. रजनीताई पाटील, लक्ष्मणराव मोरे यांनी या भागाचे नंदनवन केले. गंगा माऊली साखर कारखान्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांना ऊसाला चांगला भाव मिळत आहे. उमरी भागातील शेतकऱ्यांना सौर ऊर्जा प्रकल्पामुळे दिवसभर विद्युत पुरवठा होणार असल्याने त्यांच्या जीवनात समृद्धी येईल असे मत व्यक्त केले. कार्यक्रमास परिसरातून शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी गंगा माऊली शुगर इंडस्ट्रीज कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# परळी न्यायालयाची नवीन इमारत पर्यावरणपूरक व्हावी : ना. पंकजा मुंडे

## सोशल मीडियातील फेक अकाउंटवर आळा घालण्यासाठी कडक कायदा होण्याची गरज

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

परळी येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयाची नूतन इमारत पर्यावरणपूरक व्हावी, यासाठी जे काही सहकार्य लागेल ते आपण निश्चितपणे करू असं राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी येथे सांगितले. इमारतीसाठी सौर ऊर्जेचा वापर करण्यात यावा. निर्माणाधीन इमारतीवर पाण्याचे रिसायकलिंग करण्याची व्यवस्था असावी. न्यायालयाच्या परिसरात जास्तीत जास्त वृक्ष लागवड करावी असेही त्यांनी यावेळी म्हटले.
परळी येथे ४१ कोटी रूपये खर्च करून बाधण्यात येणाऱ्या दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या नूतन



इमारतीच्या कोनशिला समारंभ आज मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती नितीन सूर्यवंशी यांच्या हस्ते आणि ना. पंकजाताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. त्यावेळी त्या बोलत होत्या. बीडचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश आनंद यावलकर, बार कौन्सिल महाराष्ट्राचे सदस्य व्ही डी साळुंके, परळीचे दिवाणी न्यायाधीश दिपक बोर्डे, वकील संघाचे अध्यक्ष ड हरिभाऊ गुट्टे आदींसह मान्यवर उपस्थित होते.
ना.पंकजाताई मुंडे यावेळी पुढे बोलताना म्हणाल्या, परळी न्यायालयाला नवीन इमारत मिळाली याचा मनस्वी आनंद होतो आहे. लोकनेते मुंडे साहेबांच्या प्रयत्नाने परळी तालुक्याची निर्मिती झाल्यानंतर परळीत न्यायालय सुरू झाले. पुढे २००९ साली मी परळीची आमदार असताना कोर्टाची इमारत इरिगेशन विभागाच्या रेस्ट हाऊसच्या जागेत आणली. तेंव्हापासून सातत्याने आम्ही विकासाच्या प्रश्नांवर काम करत आहोत. विकास ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. ही प्रक्रिया थांबवणार नसल्याचे त्या म्हणाल्या. राज्य सरकारचा घटक म्हणुन स्वतः पुढाकार घेऊन लोकहिताच्या कामासाठी जे काही करता येईल त्यासाठी पूर्णपणे सहकार्य करणार असल्याचा विश्वास त्यांनी उपस्थितांना दिला.

### फेक अकाउंटवर कडक कायदा व्हावा

सोशल मीडियात होत असलेल्या वाढत्या गैरप्रकाराबद्दल ना.पंकजाताई मुंडे यांनी यावेळी चिंता व्यक्त केली. सोशल मीडियावर फेक अकाऊंटच्या माध्यमातून खोटी माहिती व बनावट ट्रोलिंगचे वाईट प्रकार सुरू आहेत. अशा प्रवृत्ती समाजात वाढत आहेत, यावर कुठेतरी आळा बसला पाहिजे. सोशल मीडियाच्या या गैरवापराविरोधात कडक कायदा करण्याची आवश्यकता असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

# बीड शहर पोलिसांचा गुटख्याच्या अड्ड्यावर छापा

बीड । प्रतिनिधी

बीड शहर पोलिसांना खात्रीशीर माहिती मिळाली होती की शहरात काही ठिकाणी गुटखा साठा करून ठेवला आहे, आणि लवकरच तो माल पानटपरी, आणि किराणा दुकानदार वरून वितरित होणार आहे. यावरून पोलिसांनी पथक तयार करून छापा मारला असता, एकूण साडेचार लाखाचा मुद्देमाल मिळून आला आहे. यात मोमीन मोहम्मद तक्युदिन पिता फजिउद्दीन राहणार हत्तीखाना, बीड यास अटक करण्यात आली असून यातील आरोपी वाजेद हा फरार आहे. तसेच यामध्ये एक अल्पवयीन मुलगा सुद्धा ताब्यात घेण्यात आला होता. यामध्ये आणखी आरोपी निष्पन्न होणार असून हा माल कोठे कोठे पाठवला गेला होता, कोण कोणत्या पान टपरीवर हा सप्लाय केला जात होता, याचा तपास करुन निष्पन्न झालेल्यांना आरोपी करुन यामध्ये पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहेत. यातील अटक आरोपीला तीन दिवसांची पीसीआर मिळाली आहे.



पोलिस अधीक्षक श्री नवनीत कावत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलिस अधिकारी विश्वंभर गोल्डे यांच्या मार्गदर्शनाखाली पी आय शितलकुमार बल्लाळ पोस्ट बीड शहर व एपीआय बाबा राठोड तसेच पीएसआय संदीप नेवरे साहेब यांच्या डी.बी. टीमने जयसिंग वायकर, अश्फाक सय्यद, सुशेन पवार, मनोज परजने, सचिन अलगट, गोवर्धन सोनवणे, तांबरे, अयोध्या डोके, शहाबाई कांबळे, शौकत यांनी ही कारवाई केली.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT